# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ३१ | बुधवार,दि. १२ जुलै २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# पांढराबोडी व लोहारा येथील पांदण रस्ता कामावर किन्हीचे मजूर

## दोन्ही ग्रामपंचायतीने नमुना ४ ची लावली वाट
## ग्रामपंचायत एजंसीच्या नावे पदाधिकारीच बनलेत कंत्राटदार



**गोंदिया:-** केंद्र व राज्य सरकारची राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मजुरांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. ही योजना पहिल्यांदा दुष्काळग्रस्त गावात व जिल्ह्यात राबविली जात होती. पण केंद्र सरकारने कायदा तयार करुन ही योजना सर्वत्र लागू केली. रस्ते, पांदन रस्ते, नाला सरळीकरण, तलाव खोलीकरण, वृक्ष लागवड,घरकुल,जनावरांचे गोठे, कुकुट पालन शेड, सिमेंट रस्ते, शेततळे, रोपवाटीका, नाली अनेक कामे केली जातात.

मात्र गोंदिया तालुक्यात सुरू असलेल्या या सर्व कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता असून मग्रारोहोयच्या नियमांना हरताळ फासण्याचे काम ग्रामपंचायतीचे सरपंच व अभियंत्याच्या माध्यमातून सुरु असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे या योजनेतंर्गत गाव-ातीलच मजुरांना काम मिळणे अपेक्षित असतांना ग्रामपंचायत स्वतःच काम करीत असल्याचा देखावा करीत पेटी कंत्राटदाराच्या माध्यमातून मग्रारोहयोंतर्गतच्या पांदण रस्ता बांधकामावर बाहेरील गावातील मजुरांना आणत असल्याचे चित्र तालुक्यातील लोहारा व पांढराबोडी येथे बघावयास मिळाले.





या कामावर बाहेरील गावच्या मजुरांना का असा प्रश्न उपस्थित केल्यावर मात्र गावातील मजुरांना हे काम येत नसल्याचे कारण काम करीत असलेला पेटीकंत्राटदार सांगायला विसरत नाही. लोहारा येथील पांदण रस्ता कामावर तालुक्यातीलच किन्ही येथील मजुरांना आणले गेले, त्यावर सरपंच ढेकवार यांनी सदर काम आपण स्वतःकरीत असल्याचे कबुल करीत आपण स्वतः त्या मजुरांची मजुरी देणार असल्याचे साांगितले. मात्र ग्रामपंचायतीच्यावतीने नमुना ४ अंतर्गत कुठलाही प्रस्ताव बाहेरील गावातील मजुरांना लोहारा येथे आणण्याकरीता घेतला नसल्याचेही सांगितले. या कामाच्या गुणवत्तेबद्दल विचारणा केल्यावर मात्र स्पष्ट न बोलता उडवाउडवीची उत्तरे दिली. या पांदणरस्ता बांधकामावर होणारा २३ लाख रुपयाचा निधीची विल्हेवाट कशापध्दतीने लावली जात आहे हे काम बघितल्यावर दिसून येते.

अशाच प्रकार तालुक्यातील पांढराबोडी येथील दोन पांदण वापरण्याची परवानगी नसताना सुद्धा या कामावर वापरले गेल्याचे दिसून आले. येथील दोन्ही काम





रस्ता बांधकामावर बघावयास मिळाले. पांढराबोडीचे सरपंच दमाये यांनी सदर दोन्ही काम पंचायत समितीचे सदस्य भुवन लिल्हारे व योगेश दमाहे करीत असल्याचे सांगितले. लिल्हारे करीत असलेल्या पांदण रस्ता कामावर सुध्दा लोहारासारखेच किन्ही येथील मजुरांना कामावर ठेवण्यात आले. त्यांचे मस्टरची नोंद माात्र ग्रामरोजगारसेवकाने केले नसल्याचे समोर आले. या कामावर सुध्दा पाहिजे त्या प्रमाणात साहित्याचा वापर केला गेलाा नसल्याचे व काळा दगडावर मातीमिश्रीत भुसारीमुरुमाचा वापर केल्याचेही दिसून आले.

सदर कामावरील मजुरांशी सवांद साधल्यानंतर त्यांना मग्रारोहयोच्या नियमाप्रमाणे सुध्दा मजुरी मिळत नसल्याचे आढळून आले. मजुरांशी व ग्रामस्थांशी केलेल्या संवादानंतर याठिकाणी रस्ताबांधकामाकडे ग्रामपंचायत ही एजंसी असली तरी सचिवांचा कुठेच लक्ष नाही. तर सरपंच हे आपल्या मर्जीने काम करीत असल्याने पांदण रस्ता बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दरम्यान लोहारा व पांढराबोडी येथील कामाच्या गुणवत्ता व अंदाजपत्रकाबद्दल अभियंता विनोद धावडे व योगेश धावडे यांना विचारणा केल्यावर अंदाजपत्रक दाखविण्यास नकार दिला. तर आम्ही काम बघितले आहे गुणवत्ता योग्य असल्याचे सांगत बाहेरील मजुरांच्या उपस्थितीवर मात्र उत्तर देण्यास टाळाटाळ केल्याने या मग्रारोहयोच्या पांदणरस्ता बांधकाम प्रकरणी राज्यसरकारच्या रोहयो विभागाने अभियंत्याच्या भूमिकेची व ग्रामपंचायत सरपंचाची सुध्दा चौकशी करुन कामाची गुणवत्ता तपासण्याकरीता त्वरीत दखल न घेतल्यास पावसाचे कारण पुढे करुन शासनाच्या लाखो रुपयाची बंदरबाट या पांदणरस्ता बांधकामातून होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मग्रारोहयो अंतर्गत कामे अंदाजपत्रकानुसार करण्यात आली नसल्याने बाहेरील एजंसी किंवा अधिकारी, जिल्हा परिषदेचे उपविभागीय अभियंत्याच्या माध्यमातून या कामाचे मुल्याकंन केल्यास यातील मोठे गौडबंगाल पुढे येण्याची शक्यता आहे. पांदण रस्त्याची कामे ही कंत्राटदार मार्फत करण्यात आली असून कामाच्या हजेरी रजिस्टरवर फक्त १ आठवडा अकुशल कामगारांची हजेरी दाखवून कुशल कामाच्या नावावर निधीची विल्हेवाट पांदण रस्ता बांधकामातून होत असल्याचे दिसून येत आहे.



## गुदमा येथे ही मनरेगातही दिरंगाई

गुदमायेथे मनरेगांतर्गत मुख्य नहरपासून पांदण रस्त्याचे काम करण्यात आले.या कामासाठी ३० लाखांचा निधी मंजूर केला होता. दरम्यान काम दर्जेदार होणार, अशी अपेक्षा गावकऱ्यांना होती. पण शासकीय नियमांना वेशीवर टांगून निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले. कामात वापरले जाणारे साहित्य दर्जाहीन होते. यामुळे कामाची गुणवत्ता ढासळल्याचे गावकऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे या कामाचीही चौकशी करुन न्याय देण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.





# शेरपार जंगलात वाघाची शिकार, छत्तीसगड वनविभागाच्या ताब्यात ११ आरोपी



**गोंदिया:-** जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील शेरपार जंगलात शिकार केलेल्या वाघाची कातडी विकत घेणाऱ्या छत्तीसगड राज्यातील बिजापूर येथील काहींना बिजापूर वनविभागाच्या अधिकाऱ्यानी ६ जुलैला वाघाच्या कातडीसह अटक केली. दरम्यान या घटनेच्या तपास करीत असताना बिजापूर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात सहभागी असलेल्या वीस जणांना आत्तापर्यंत अटक केली असून गोंदिया जिल्ह्यातील आमगाव व सालेकसा तालुक्यातील ११ जणांचा यात समावेश असल्याचे उघडकीस आले आहे. आमगाव व सालेकसा येथील आरोपींना ८ जुलै रोजी बिजापूर वनविभागाच्या पथकाने ताब्यात घेतले.

सदर वाघाची कातडी कुठून आणली याचा सविस्तर तपास करतांना पकडण्यात आलेल्या आरोपींनी महाराष्ट्र राज्यातील गोंदिया जिल्हा बॉर्डरवरून आणल्याचे सांगितले. त्यानुसार बिजापूर पोलिसांनी सालेकसा तालुक्यातील मुख्य आरोपी आणि आमगाव तालुक्यातील कातडी विकण्यास मदत करणाऱ्या आरोपींना अटक केल्याने जिल्ह्यामध्ये मोठी खळबळ माजली आहे.

जिल्ह्यात नवेगाव नागझिरा व्याघ्रप्रकल्प असून जिल्ह्याला लागूनच मध्यप्रदेश राज्यातील जंगलभागही आहे. याचा फायदा घेत वन्यप्राण्यांची तस्करी करणारी टोळी जिल्ह्यात सक्रीय असल्याचे याप्रकरणावरुन समोर आले आहहे. सालेकसा जंगलातून एका वाघाची शिकार केली आणि ही कातडी नखे, हाडे आणि मिशीचे केस हे छत्तीसगड राज्यातील बीजा-पूर येथील सीआरपीएफचे सब इन्स्पेक्टर अमित झा आणि त्याच्या २० सहकाऱ्यांना कातळी विकली. याबाबत विजापूर वन विभागाने कारवाई करत अमित झा यांच्यासह वीस जणांना या गुन्हामध्ये आरोपी करून त्यांना अटक केली.

सविस्तर तपास केला असता ही वाघाची कातडी सालेकसा तालुक्यातील शेरपार जंगलातून वाघाची शिकार करुन ही कातळी विकल्याचे समोर आले. यामध्ये मुख्य आरोपी शालिक मरकाम वय ५५, कोसाटोला/मुरुपार, सुरज मरकाम वय ४५ कोसाटोला/मुरु-पार, जियाराम मरकाम, नवाटोला सालेकसा या तिघांनी वाघाला करंट लावून मारल्याचे कबूल केले. तसेच घटनास्थळावरून वाघाच्या हाडाचे तुकडे मिळाल्याचे छत्तीसगड वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. वाघाचे नख आणि मिशीचे केस विक्री करणे असल्याचे आरोपींनी सांगितले. या तिघांना वाघाची कातडी विकण्यासाठी मदत करणाऱ्या आरोपींमध्ये गेद-लाल भोयर वय ५५, लभानधारणी, तुकाराम बघेले वय ५९, भाडीपार, अंगराज कटरे वय ६७ दरबडा, वामन फुंडे वय ६०, सिंधीटोला, या चार आरोपींना सालेकसा तालुक्यातून अटक करण्यात आली. तर विक्रीमध्ये मदत करणारे आमगाव येथील शामराव शिवनकर ५३ वर्ष, रेल्वेमध्ये नोकरी करणारे जितेंद्र पंडित , नालंदा बिहार सध्या मु. आमगाव, यादवराव पंधरे बोदरा जि. भंडारा, अशोक खोटेले वय ५०, गुदमा गोंदिया अशा अकरा लोकांना बीजापूर येथील वन अधिकाऱ्यांनी अटक केली असून या सर्वांना विजापूर छत्तीसगड येथे नेण्यात आले आहे.

# हेल्मेटसक्ती आजपासून लागू





**गोंदिया:** अपघातांवर नियंत्रण मिळवण्यासाठी गोंदिया जिल्हा पोलीस प्रशासनाकडून आज, ११ जुलैपासून हेल्मेटसक्ती लागू करण्यात आली आहे. पुढील तीन दिवस हेल्मेट न वापरणाऱ्यांचे समुपदेशन केले जाणार असून त्यानंतर मात्र दंडात्मक कारवाई केली जाईल. विशेष म्हणजे, हेल्मेट परिधान करून वाहन चालविणाऱ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले जाणार आहे.

व्यापारी व शहरवासियांना हेल्मेटसक्तीतून मुभा द्यावी, अशी विनंती जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली होती. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. दुचाकी चालवताना चालकांनी हेल्मेट वापरणे बंधनकारक आहे. केवळ कारवाई करणे हा आमचा उद्देश नसून दुचाकीचालकांची सुरक्षा हा मुख्य उद्देश आहे. दुचाकीचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे आणि पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक पोलीस विभागाकडून करण्यात आले आहे.

शहरासह जिल्ह्यात दुचाकीचालकांना हेल्मेट वापरणे बंधनकारक असणार आहे. विनाहेल्मेट दुचाकी चालवणाऱ्यांना अडवून परत घरी पाठविले जाणार आहे.त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व अपघात कमी करण्यासाठी जिल्हा पोलिस विभागाकडून मोटार वाहन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार आहे. जिल्हा वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक जयेश भांडारकर यांनी शुक्रवार ७ जुलै रोजी याबाबतचे पत्र सर्व पोलिस ठाणे प्रमुखाना जारी केले आहे.

आकडेवारीनुसार जिल्ह्यात गतवर्षात अपघातांमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये ७० टक्के मृत्यू डोक्याला दुखापत झाल्यामुळे झाले आहे.अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहतूक पोलिस विभागाकडून मोटार वाहन नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांविरुद्धच्या कारवाईमध्ये वाढ करण्यात येणार आहे. दुचाकीस्वारांनी चांगल्या प्रतीचे हेल्मेट परिधान करूनच प्रवास करावा. अन्यथा मोटार वाहन कायद्यानुसार दंड व परवाना निलंबनाची कारवाई केली जाणार आहे.

# राज्यपाल नियुक्त आमदार नियुक्तीचा मार्ग मोकळा

**दिल्ली**-महाराष्ट्र विधानपरिषदेच्या एकूण सदस्यसंख्या ७८ आहे. त्यापैकी १२ सदस्यांची नियुक्ती राज्यपाल मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानंतर करतात. मात्र, महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या राज्यपाल नियुक्त आमदारांच्या सदस्यांच्या नियुक्तीचा प्रश्न गेल्या दोन वर्षांपासून रखडला आहे. राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या संदर्भातील याचिकेवर सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरु होती. या प्रकरणी सुप्रीम कोर्टाने स्थगिती उठवली असून त्यामुळे आता राज्यपाल नियुक्त आमदारांचा मार्ग मोकळा झाला आहे.मुंबई हायकोर्टात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याविरोधात जनहित याचिका करणारे नाशिकमधील रतन सोली लुथ यांनी हायकोर्टाने १३ ऑगस्ट २०२१ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात सुप्रीम कोर्टात अपिल केले होते. **पान ३ वर**

# मुकुल,भार्गव फ्रान्सच्या बॅस्टिल परेडमध्ये सहभागी होणार



**गोंदिया** : जिल्ह्यातील हिराटोला गा-वातील मुकुल देवेंद्र बोपचे (२१) आणि खैरबोडी ता. तिरोडा गा-वातील भार्गव साहेबराव भगत (२१), हे २ शौर्यवीर १४ जुलैला फ्रान्समध्ये होणाऱ्या बॅस्टिल परेडमध्ये सहभागी होणार आहे.

१४ जुलै हा दिवस फ्रान्सचा राष्ट्रीय दिवस म्हणून साजरा केला जातो.फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात १७८९ मध्ये याच दिवशी बॅस्टिलपासून या क्रांतीची ठिणगी पेटली होती. यावर्षीचा "बॅस्टिल डे' सोहळा भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. विशेष बाब म्हणजे, भारतीय नौदलाच्या तुक्डीत विदर्भातील २ शौर्यवीर सहभागी होणार आहेत. गोंदिया जिल्ह्यातून बॅस्टिल परेडसाठी पहिल्यांदाच कुणाची निवड झाली आहे.मुकुल गेली सलग दोन वर्षे २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील राजपथावरील परेडमध्ये सहभागी झाला. मुकुल आणि भार्गवचे जिल्हाभरात कौतुक होत आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकांऐवजी सुशिक्षीत बेरोजगारांना संधी द्या-आ.अडबाले

**गोंदिया** : जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्याबाबत काढलेले परिपत्रक रद्द करून सुशिक्षीत बेरोजगारांची नियुक्ती करावी.तसेच अनेक जिल्हा परिषद शाळेमध्ये घड्याळी तासिका तत्वावर कार्यरत सुशिक्षीत बेरोजगारांचे या रिक्त पदांवर समायोजन करावे, अशी मागणी नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण मंत्री दीपक केसरकर व शिक्षण आयुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा सुरु होऊनही अनेक ठिकाणी शिक्षकांची पदे रिक्त आहेत. अशावेळी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी राज्य सरकारने रिक्त पदांवर शिक्षकभरती होईपर्यंत सेवानिवृत्त शिक्षकांनाच कंत्राटी पद्धतीने नेमण्याचे शासन परिपत्रक ७ जुलै २०२३ रोजी जारी करण्यात आले. यात सदर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष असून त्यांना २० हजार रुपये प्रतिमाह मानधन देण्यात येणार आहे. सोबतच



अनेक तरतुदी यात आहेत. नियोजित शिक्षक भरती उच्च न्यायालयातील रिट याचिकांमुळे लांबल्याचे सरकारच्या निदर्शनास आले आहे.यामुळे पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षकभरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत हा उपाय काढण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे सांगण्यात येत आहे.

मात्र,राज्यात मोठ्या प्रमाणात सुशिक्षीत बेरोजगार असताना सेवानिवृत्त शिक्षकांना कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणे,चुकीचे आहे. महत्वाचे म्हणजे सेवानिवृत्त होऊन अनेक वर्ष झालेले शिक्षक पुन्हा कंत्राटी पद्धतीने सेवा देण्यास तयार होतील का? याबाबत प्रश्न आहे.

राज्यात सर्व कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे आहे. त्यापुर्वीच ५० वर्षे वयानंतर से-वेत कायम ठेवण्यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र मागण्यात येते. मग ५८ वयानंतर हे कर्मचारी लहान बालकांना शिकवण्याचे काम उत्तमपणे करूशकतील का? हाही प्रश्न आहे. तसेच अनेक शिक्षक वैद्यकीय व अन्य कारणास्तव स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतात, कारण त्यांना योग्यपणे सेवेला न्याय देता येत नाही. अशा शिक्षकांना पुन्हा सेवेत घेणे म्हणजे विद्यार्थ्यांवर अन्यायच करणे होय. त्यामुळे सेवानिवृत्त शिक्षकांना कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद शाळांतील रिक्त पदावर नियुक्ती करणारे शासन परिपत्रक रद्द करावे अशी मागणी नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी केली आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकांना मिळणार आता पुन्हा अध्यापनाची संधी

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य सरकारने शिक्षक भरतीसाठी बनवलेल्या "पवित्र' या ऑनलाईन प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीद्वारे शिक्षक नेमण्यात बराच वेळ जाणार आहे. त्यात राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षक उपलब्ध होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी अनुदानित शाळांमधील सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी स्वरूपात तात्पुरती नियुक्ती करण्याचा निर्णय ७ जुर्ले रोजी शालेय शिक्षण विभागाच्यावतीने घेण्यात आला आहे.

नियोजित शिक्षक भरती प्रक्रियेबाबत उच्च न्यायालयात दाखल याचिकांमुळे भरती प्रक्रियेत विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आता सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरती नियुक्ती करण्याच्या निर्णय घेण्यात आला. त्याबाबतचे निर्देश शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी परिपत्रकाद्वारे दिले. सेवानिवृत्त शिक्षकांच्या तात्पुरत्या नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा



७० वर्षे असून दरमहा २० हजार रुपये मानधन दिले जाणार आहहे. नियुक्तीसाठी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांबरोबर करारनामा करणे आवश्यक आहे.

नियुक्तीच्या कालावधीत शिक्षकीय पदाचे काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या अटी-शर्ती मान्य असल्याचे, करार पद्धतीने नियुक्त केलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत किंवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, या आशयाचे हमीपत्र घ्यावे. प्रत्येक जिल्ह्यासाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पात्र आणि इच्छुक उमेदवारांकडून आवेदनपत्र अर्ज मागवून नियुक्ती आदेश द्यावेत. संबंधित शाळेतील रिक्त शिक्षकीय पदाची गरज लक्षात घेऊन त्या प्रमाणे अत्यावश्यक पदावर नियुक्ती द्यावी, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच शिक्षक नियुक्तीची प्रक्रिया शिक्षण आयुक्तांच्या नियंत्रणाखाली पूर्ण करण्यात येणार आहे.

## संपादकीय

# नेमणूक एकीकडे,मुक्काम दुसरीकडे

राज्यातील लोकांच्या हितासाठी, त्यांच्या कल्याणासाठी देशाच्या विविध राज्यांत राज्य सरकारे स्थापन झाली आहेत. देशाने लोकशाही प्रणाली स्वीकारल्याने लोकांनी निवडून दिलेले सरकार बहुमताच्या आधारावर राज्याचा कारभार चालवत असते. त्यानुसार राजकीय पक्षांच्या संख्येच्या बळावर त्या त्या पक्षाची सत्ता राज्यांमध्ये स्थापन होते. मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील सदस्य राज्य सरकारचा कारभार चालवत असतात. त्याप्रमाणे महाराष्ट्रात एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या शिवसेना-भाजपचे सरकार महाराष्ट्राचा कारभार चालवत आहे. राज्यातील जनतेच्या हिताचे विविध निर्णय राज्य सरकार घेत असते. मात्र या निर्णयांची, योजनांची अंमलबजावणी यशस्वीरीतीने व्हावी आणि त्याचा फायदा जनतेला व्हावा यासाठी सरकारने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून हा कारभार चालत असतो.

शासनाने विविध खात्यांची निर्मिती केली आहे. राज्यातील आरोग्य विभाग, शिक्षण, कृषी, ग्रामविकास, सार्वजानिक बांधकाम, अन्न-धान्य वितरण विभाग, पाणीपुरवठा, विद्युत, महसूल, नगरविकास, गृह विभाग यासारख्या अनेक विभागांचा कारभार मंत्रालयातून चालवला जातो. जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळावा, त्यांच्या हिताचे निर्णय व्हावेत यासाठी संबंधित खात्याच्या मंत्र्याचे त्यावर प्रत्यक्ष नियंत्रण असते. मंत्रालयातील संबंधित विभागाचा सचिव प्रशासकीय कामकाजासाठी जबाबदार असतो. त्याखालोखाल त्या त्या विभागाचे आयुक्त, पोलीस विभागाचे महासंचालक, पोलीस आयुक्त, संचालक, उपसंचालक, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, तहसीलदार अशी ही प्रशासकीय यंत्रणा संपूर्ण राज्यात काम करीत असते. राज्यातील जनतेला सोयीचे व्हावे, त्यांना अधिक कष्ट पडू नये, आर्थिक झळ बसू नये म्हणून शासकीय यंत्रणा तालुका पातळीपर्यंत काम करीत असते. राज्य सरकारच्या वतीने प्रत्येक विभागाचे काम परिणामकारकपणे व्हावे, जलदगतीने व्हावे आणि त्याचा लाभ थेट जनतेला मिळावा यासाठी ही कर्मचारी यंत्रणा राबत असते. राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस विभाग कार्यरत असतो. शासकीय कर्मचारी म्हटला की, त्याच्या नियुक्तीचे अधिकार हे राज्य सरकारला असतात अथवा त्यांच्या बदलीचे अधिकारही सरकारलाच असतात. शासकीय नियम पाळणे, नियमानुसार काम करणे हे शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांना बंधनकारक आहे. जे कर्मचारी शासकीय नियमांचे पालन करीत नसतील, मनमानीपणे वागत असतील, तर त्यांच्यावर कारवाई शासन करू शकते, कारण राज्य सरकारने त्यांना नियुक्त केलेले असते आणि त्यांचा पगारही शासन करीत असते. त्यामुळे अधिकारी काय किंवा कम 'चारी काय हे राज्य सरकारशी बांधील आहेत; परंतु शासकीय कर्मचारी शासन नियमांचे पालन करीत नाहीत, नियमांचे सतत उल्लंघन करीत असतील, तर अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाते आणि ती झालीच पाहिजे. कारण जनतेच्या कामासाठी सरकारने त्यांना नियुक्त केले आहे. त्यासाठीच सरकारचा पगारही त्यांना दिला जातो म्हणून कर्तव्य म्हणून त्यांनी आपले काम चोखपणे बजावले पाहिजे.

आज अनेक ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे ठिकाण एकीकडे आणि ते राहतात कुठे अशी परिस्थिती आहे. अनेकजण आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी राहत नसल्याचे, हजर राहत नसल्याचे अनेक वेळा आढळून आले आहे. शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्याने आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी राहून जनतेला सेवा द्यावी, हा त्यामागे हेतू आहे. यासाठी शासनाने त्यांच्या कामाच्या ठिकाणी निवासाची व्यवस्था करुन दिलेली आहे. असे असतानाही कुणी तालुक्याच्या ठिकाणी, तर कुणी जिल्ह्याच्या ठिकाणी राहून ये-जा करतात. मग कधी दांडी मारायची, वेळ झाला म्हणून अर्ध्या वाटेतूनच घरी निघून जायचे, आजारी असल्याचे कारण सांगून घरी अथवा खासगी कामासाठी दांडी मारावी, वैद्यकीय कारण सांगून अवेळीच कामावरुन पळ काढणे असे प्रकार चाललेले असतात. त्यामुळे शासकीय नियमानुसार अशा कामचुकार, बेशिस्त अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई होणे आवश्यक आहे. दोनच दिवसांपूर्वी नवे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या गडचिरोली दौऱ्यादरम्यान याबाबतची खंत बोलून दाखवली. शासकीय कर्मचारी अथवा अधिकाऱ्यांनी आपल्या हेडक्वॉर्टरला थांबलेच पाहिजे, असा नियम आहे. शासनाचा गलेलठ्ठ पगार व अन्य सुविधा असतानाही अनेक कर्मचारी बाहेरगावाहून कामाच्या ठिकणी ये-जा करतात. त्यामुळे कामावर परिणाम होणे, जी गोरगरीब जनता कामासाठी बाहेर गावाहून अनेक मैलांचा प्रवास आर्थिक भूर्दंड सहन करुन तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी आलेली असते, अशांची कामे होत नाहीत. साहेब अद्याप आले नाहीत, आजारी आहेत, बस मिळाली नाही अशी विविध कारणे त्यांच्या कार्यालयातून सांगितली जातात. परिणामी ज्या कामासाठी लोक आलेले असतात, ती कामे होत नाहीत आणि रिकाम्या हाताने त्यांना घरी जावे लागते, अशी आज परिस्थिती आहे. असे होऊ नये यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोलून दाखवलेली खंत यावर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. राज्याचे कृषिमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनीही यासंदर्भात बैठक घेऊन कर्मचाऱ्यांनी आपल्या कामाच्या ठिकाणी हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

वास्तविक जनतेशी अत्यंत निगडित जी महत्त्वाची खाती आहेत, त्यापैकी आरोग्य, शिक्षण, कृषी, गृह, महसूल आदी विभागांचे अधिकारी, कर्मचारी आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी वास्तव्यास असले पाहिजे. या विभागांचे जसे डॉक्टर, मुख्याध्यापक-शिक्षक, पोलीस, पशुवैद्यक यांचा नित्याचा जनतेशी संबंध येतो. हेच शासननियुक्त कर्मचारी आपल्या काम ाच्या ठिकाणी उपस्थित राहणार नसतील, तर लोकांची किती गैरसोय होते, किती अडचणी, समस्या निर्माण होतात हे अनेकांनी अनुभवलेले आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कर्मचाऱ्यांनी आपल्या हेडक्वार्टरला उपस्थित राहणे आवश्यक आहे, हे वक्तव्य अधोरेखित होते आणि त्यांनी व्यक्त केलेली खंतही किती बरोबर आहे, हे ध्यानात आल्याशिवाय राहत नाही. नियुक्तीचे ठिकाण गडचिरोली असेल आणि कर्मचारी नागपूरला वा चंद्रपूरसारख्या शहरात राहत असतील आणि तेथून आपला कारभार हाकत असतील, तर ते किती योग्य आहे का? याचा त्यांनी विचार केला पाहिजे.

# ओबीसींना मिळावा वसतिगृहांचा आधार



**गोंदिया:** ३० जानेवारी २०११ रोजी ओबीसी मंत्रालयाने स्वतंत्र वसतिगृहाची घोषणा केली. पण ही घोषणा केंद्र व राज्य सरकारच्या उदासीन धोरणात अडकली असून, कोणत्याही जिल्ह्यात वसतिगृह तयार झालेले नाही. शासनाने ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना सुरु करुन ओबीसींना शिक्षणापासून वंचित ठेवू नये. वसतिगृहात्मक शिक्षण हे शिक्षणाप्रमाणे एक साधन आहे. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक व शैक्षणिकदृष्ट्या कोल्हापुरच्या विकासात राजर्षी शाहू यांचे कार्य व शैक्षणिकदृष्ट्या योगदान महत्वाचे आहे. सर्व समाज साक्षर झाला पाहिजे. आपल्या राजयात, संस्थानात जे अज्ञानी, दरिद्री लोक आहेत त्यांना शैक्षणिकदृष्ट्या जागरुक करण्यासाठी वसतिगृहासारखे उपक्रम राबविले. तत्कालीन काळात उच्च शिक्षणाच्या सर्व सोयी सुविधा ग्रामीण भागापर्यंत पोहोचविणे शक्य नव्हते. परंतु त्या भागातील हुशार, होतकरु गरीब मुले उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी त्यांनी कोल्हापूर शहरात वसतिगृहात्मक शिक्षणाची व्यवस्था केली. स्वघरापासून दूर असलेले घर म्हणजे वसतिगृह अशी भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली. करवीर संस्थानात वसतिगृहात्मक शिक्षणाची प्रचंड चळवळ शाहूंनी सुरु केली. महाराष्ट्राच्या शैक्षणिक-पार्श्वभुमीचा विचार करता वसतिगृहात्मक चळवळ कोल्हापूरमध्ये मोठ्या प्रमाणात सुरु होती.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक पार्श्वभुमीमध्ये महात्मा फुले यांचे योगदान महत्वाचे आहे. सत्यशोधक समाजात वक्ते तयार व्हारे, तरुणांना निबंध लिहता यावे, समाजाचे मुखपत्र असावे, विद्यार्थ्यांना विद्यावेतन द्यावे, शेतील सुधारणा करावी यासारखे कार्यक्रम सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते, सेवक करत होते. संस्थानिमार्फत सामाजिक उपक्रम सुरु होते. त्यांना आर्थिकदृष्ट्या संस्थानिक मदत करत होते. शहरात शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात राहण्याची, जेवणाची सोय सामाजिक संस्था करत होत्या. सत्यशोधक समाजाचे योगदान याबाबत चांगले होते.

१६ मे १९८४ च्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहात आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी तसेच इतर मागास-वर्गीय विद्यार्थ्यांसाठी २० टक्के जाागा राखीव ठेवण्यात येत होत्या. या २० टक्के जागामधून बहुतांश इतर मागासगर्वीय विद्यार्थी प्रवेश घ्यायचे. ३० जुलै २०१४ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती ८० टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती १० टक्के आणि इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग १० टक्के वसतिगृहात आरक्षित होते. महाराष्ट्र सरकारने स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन झाल्यानंतर २१ डिसेंबर २०१८ च्या निर्णयानुसार समाजकल्याण विभागाच्या सर्व वसतिगृहामध्ये ८० टक्के अनुसुचित जातीचे विद्यार्थी, ३ टक्के अनुसूचित जमातीचे विद्यार्थी. ५ टक्के विमुक्त जाती व भटक्या जमातीचे विद्यार्थी, ६ टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व इतर मागास प्रवर्ग विद्यार्थी, २ टक्के विशेष मागास प्रवर्गाचे विद्यार्थी, ३ टक्के अपंग विद्यार्थी, २ टक्के अनाथ विद्यार्थी याप्रमाणे वर्गीकरण करण्यात आल्याने इतर मागासवर्गीय विद्यार्थी या वसतिगृहातील प्रवेशापासून वंचित झाले.

३० जानेवारी २०१९ रोजी ओबीसी मंत्रालयाने स्वतंत्र वसतिगृहाची घोषणा केली. पण ही घोषणा केंद्र व राज्य सरकारच्या उदासीन धोरणात अडकली असून, कोणत्याही जिल्ह्यात वसतिगृह तयार झालेले नाही. राज्य सरकारने २८ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रत्येक जिल्ह्यात मुला व मुलींचे प्रत्येकी एक शासकीय वसतिगृह भाडे तत्वावर चालविण्याचे धोरण स्विकारले. शैक्षणिक सत्र सुरु झाले असूनही वसतिगृह सुरु झालेले नाही. सद्य:स्थितीत नवीन नियुक्त कर्मचारी वर्ग व इमारती उभारणे अथवा भाड्याने घेणे यासाठी बराच कालावधी जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून मोठ्या प्रमाणावर इतर मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह प्रवेशापासून वंचित आहेत. किमान शासनाने ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना सुरु करून ओबीसींना शिक्षणापासून वंचित ठेवू नये.

# कौशल्याधारित शिक्षण ही काळाची गरज-कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी

## शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयात फॅशन डिझायनिंग प्रयोगशाळेचे उद्घाटन




**अर्जुनी-मोरगाव:** महाविद्यालयामधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, तसेच विविध प्रकारचे कौशल्य आत्मसात करुन युवकांना स्वयंरोजगार निर्माण करता यावा अशा प्रकारच्या शिक्षणाची आज गरज निर्माण झाली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे हे शताब्दी महोत्सव वर्ष असल्याने गाव चलो अभियान अंतर्गत विद्यापीठाच्या पातळीवर विविध प्रकारचे उपक्रम राबविले जात असून महाविद्यालयातून कौशल्याधारित शिक्षण निर्माण करुन जास्तीत-जास्त युवकांना त्याचा फायदा व्हावा आणि शिक्षणाची ही लाट केवळ शहरी भागा-पुरता मर्यादित न राहता त्याचा फायदा ग्रामीण क्षेत्रातील ही युवकांना व्हावा, असा यामागील उद्देश असल्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी यांनी असे मत व्यक्त केले. ते स्थानिक शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयात फॅशन डिझायनिंग प्रयोगशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी लुनकरण चितलांगे, प्रमुख अतिथी समता फाऊंडेशनचे संस्थापक आणि प्रमुख विश्वस्त पुरुषोत्तम अग्रवाल, विशेष अतिथी डॉ. भुषण महाजन, डॉ. प्रमोद खेडेकर, डॉ. प्रकाश इटनकर, डॉ. निशिकांत राऊत, प्रमुख उपस्थिती प्रियंका घुले, सचिव मुकेश जायस्वाल, डॉ. कैलास गाडेकर आणि प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. प्रास्ताविकेतून डॉ. ईश्वर मोहुर्ले यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्या-पीठ आणि समता फाऊंडेशनच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची सुरुवात ही आपल्या महाविद्यालयापासून होत असल्याचे आनंद व्यक्त केला आणि असे उपक्रम राबविण्यास आम्ही तत्पर असल्याचे सांगितले. याप्रसंगी कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी आणि पुरुषोत्तम अग्रवाल यांचा शाल, श्रीफळ, सम्माचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी जीवन गौरव पुरस्कार प्राप्त श्री पुरुषोत्तम अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त करताना समता फाऊंडेशनच्यावतीने लोकोपयोगी असे विविध उपक्रम चालविले जात असून आरोग्यविषयक, शिक्षण विषयक कार्याचा ग्रामीण लोकांना फायदा व्हावा, ग्रामीण भागातही उद्योजक निर्माण करणे हे आपले ध्येय असल्याचे आणि या माध्यमातून समाजाचे ऋण फेडण्याचे कार्य व्हावे, सामाजाची सामाजिक उन्नती व्हावी आणि समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा आमचा सदैव प्रयत्न आहे अशी ग्वाही दिली.

फॅशन डिझायनिंग प्रयोगशाळेत समता फाऊंडेशनच्यावतीने एूण १६ शिलाई मशीन देण्यात आल्या. समता फाऊंडेशन आणि जिल्हा सामान्य रुग्णालय गोंदियाच्यावतीने नेत्र तपासणी शिबिर आणि समता सुविधा केंद्रच्यावतीने आयुष्यमान कार्ड नोंदणी आणि वितरणचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण १४५ रूग्णाची मोफत तपासणी करुन त्यांना लवकरच मोफत चष्मे आणि मोतिया बिंदूची मोफत शस्त्रक्रिया करुन देण्यात येणार आहे. तसेच १०० नागरिकांचे आयुष्यमान कार्ड तयार करुन वितरित केले जातील. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याच कार्यक्रमात ईश्रम कार्ड तसेच आयुष्यमान भारत कार्ड गरजू व्यक्तींना बनवून उपलब्ध करुन देण्यात आले व त्यांचे वाटप प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणातून लुनकरण चितलांगे यांनी ग्रामीण भागातील आमच्या महाविद्यालयाला एवढी मोठी संधी दिल्याबद्दल समता फाऊंडेशन आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे आभार व्यक्त केले. तसेच समाजोपयोगी विविध उपक्रम राबविणयास आम्ही नेहमीच तत्पर असल्याचे सांगितले. गेल्या वर्षभरापासून प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले यांच्या मार्गदर्शनात विविध व्यक्तिमत्व विकासात्मक, विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात्मक कौशल्याधारित कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन केले जात आहे.

या कार्यक्रमाचे संचालन डॉ. शरद मेश्राम यांनी केले. तर आभार डॉ. मोतीलाल दर्वे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता समता फाऊंडेशनचे रवींद्र गरजे, स्मिता कांबळे तसेच महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयोचे स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# प्रामाणिक प्रयत्न हाच यशाचा मार्ग-डॉ.राजेश चांडक

**अर्जुनी मोरगाव:** - जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर आपल्या कर्तृत्वात प्रामाणिकपणा असावा. प्रामाणिकपणाशिवाय कुणीही यशस्वी होऊ शकत नाही. या महाविद्यालयातील तीस वर्षाच्या सेवेत माझ्यासोबतच्या सर्व सहकार्याच्या सहकार्यानेच मी यशस्वी होऊ शकलो असे मत शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. राजेश चांडक यांनी व्यक्त केले

डॉ. राजेश चांडक यांची साकोली येथील एस. चंद्रा महाविद्यालयात नुकतीच प्राचार्य म्हणून नियुक्ती झाल्याने श्री दुर्गा शिक्षण संस्था, एस. एस. जायस्वाल महाविद्यालय आणि प्राध्यापक परिषदेच्या वतीने डॉ. राजेश चांडक यांचा सत्कार व निरोप समारंभ कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री लुनकरणजी चितलांगे, प्रमुख पाहुणे सचिव श्री मुकेश जायस्वाल, उपाध्यक्ष मा. बद्रीप्रसादजी जायस्वाल, श्री नंदकिशोरजी राठी, डॉ. कैलास गाडेकर, डॉ राजेश चांडक, सौ वर्षा चांडक, श्री रमण चांडक आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ईश्वर मोहुर्ले आणि उपस्थित होते

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि स्व. शिवप्रसादजी जायस्वाल यांच्या प्रतिमा पूजनाने झाली प्रस्ताविकातून प्राध्यापक परिषदेचे सचिव डॉ. आशिष कावळे यांनी या कार्यक्रमाची पार्श्वभूमी व्यक्त करीत डॉ. राजेश चांडक यांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकला. मनोगत व्यक्त करताना डॉ. गोपाल पालीवाल, डॉ. पी. एस. डांगे, प्रा. श्रीकांत नाकाडे यांनी डॉ. राजेश चांडक यांच्या विविध कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला. प्रमुख अतिथी श्री बद्रीप्रसादजी जायस्वाल यांनी महाविद्यालयाच्या उभारणीपासून डॉ. राजेश चांडक यांचे या महाविद्यालयाला मोठे करण्यात मोठा हातभार लागले असल्याचे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ ईश्वर मोहुर्ले यांनी डॉ. राजेश चांडक हे केवळ शैक्षणिक कार्यापुरते मर्यादित न राहता सामाजिक कार्यातही त्यांचे मोठे योगदान असल्याचे आणि स्वतः ५० पेक्षा जास्त वेळा त्यांनी रक्तदान केले असल्याचे मत व्यक्त केले

यावेळी डॉ राजेश चांडक यांचा शाल, श्रीफळ, भेटवस्तू, पुष्प गुच्छ देऊन तसेच प्राध्यापक परिषदेच्या वतीने भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणातून श्री लूनकरणजी चितलांगे यांनी डॉ राजेश चांडक यांचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे संचालन डॉ शरद मेश्राम यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. लक्ष्मीकांत कापगते यांनी व्यक्त केले. कार्यक्रम ाला सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# मौदा येथे विदर्भ तेली महासंघाच्या संवाद यात्रेदरम्यान चर्चा



**मौदा:-** नागपूर जिल्ह्यातील विदर्भ तेली समाज महासंघ द्वारा संवाद यात्रेदरम्यान मौदा येथील धनजोडे सभागृहात ९ जुलै रविवारीला बैठक घेत विविध विषयावर चर्चा करण्यात आली. या बैठकीत ओबीसीची जातीनिहाय जनगणना, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी शासनाची प्रस्तावित ७२ वसतिगृह, ओबीसींना संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व (आरक्षण) मिळावे, रोजगार व उद्योग निर्मिती, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीला कृष्णाजी बेले, रमेश पिसे, संजय सोनटक्के, जगदिश वाडिभस्मे (जिल्हाध्यक्ष-भारतीय ओबीसी शोषित संघटन व ओबीसी जनमोर्चा, नागपूर), ज्ञानेशवर लांजेवार, भाऊराव धनजोडे, अ‍ॅड.मधुकर तिघरे, स्वराज काणतोडे, मस्केजी, सहादेव तिघरे, दामोदर वैद्य, कृष्णा पिसे, पवन वैद्य, प्रज्वल लांजेवार आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# समान नागरी संहिता कायदा आहे की षडयंत्र...???

समान नागरी कायदा म्हणजेच UCC हा मुस्लिम विरोधी कायदा आहे या गैरसमजात काही जण अजूनही आहेत. त्यांच्या अज्ञानाची खरोखरच दया आणि लाज वाटली पाहिजे. वास्तवात UCC हे विशेषत एससी , एसटी आणि ओबीसी विरुद्ध त्यांचे हक्क पूर्णपणे हिरावून घेण्याचे षड्यंत्र आहे.

हा कायदा पूर्णपणे मुस्लिम ांच्या विरोधात असल्याचा आभास निर्माण करण्यासाठी काही मुस्लिम चमचे (नेते) UCC च्या विरोधात काही गाजावाजा करण्यासाठी नियुक्त केले गेले आहेत. पण आम्ही असे मानल्यास आम्ही शापित होऊ. या कायद्यामुळे मुस्लिमांचे जास्तीत जास्त नुकसान होऊ शकते ते प्रतीकात्मक नुकसान आहे. मुस्लिम हे आधीपासूनच एक वेगळे धार्मिक अस्तित्व आहे ज्याची स्वतःची नियमित व्यवस्था आहे. त्यांनी भूतकाळात इतरांच्या अशा कारस्थानांवर मात केली तशीच ते या परिस्थितीवर मात करतील. मुस्लिमांना ७३ वर्षे कम्युनिस्ट रशियाप्रमाणे समान नागरी संहिते पासून वाचवण्यात आले. शेवटी रशियाने गुडघे टेकले.

लोकप्रिय समजुतीच्या विरुद्ध UCC मुळे SC, ST, OBC समुदायांना सर्वात जास्त नुकसान होते. जर UCC मंजूर झाला तर आपल्या संविधानाने बहुजन समाजाला दिलेले सर्व विशेषाधिकार संपुष्टात येतील.

दुसरे असे की अ‍ॅट्रॉसिटी कायदा गंभीर धोक्यात येईल. समाजातील एका विशिष्ट वर्गाला मूर्ख बनवण्यासाठी या कायद्याचे फायदे काही काळ टिकवून ठेवता येतील आणि मग संपूर्ण कायदा रद्द होईपर्यंत ही तरतूद हळूहळू कमी केली जाईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आदिवासींना त्यांच्या "जल, जंगल, जमीन", त्यांची ओळख आणि अस्मिता यांच्या संदर्भात दिलेले विशेष विशेषाधिकार हे सर्व UCC द्वारे पूर्णपणे रद्द केले जातील.

आपल्या राज्यघटनेच्या पाचव्या आणि सहाव्या अनुसूचीनुसार, कोणत्याही बिगर आदिवासीला किंवा अगदी सरकारलाही आदिवासी भागात जमीन खरेदी-विक्रीची परवानगी नाही.

जिल्हाधिकाऱ्यांच्या स्पष्ट परवानगीशिवाय कोणत्याही आदिवासींना (गैर-आदिवासी) कोणतीही आदिवासी जमीन खरेदी करण्याची परवानगी नाही. जमीन खरेदी केल्यानंतरही बिगर आदिवासींना फक्त ३-५ फुट खाली जमीन वापरण्याची परवानगी आहे. वरील खोलीच्या पलीकडची जमीन आदिवासींची असेल.




उपग्रह आणि भूगर्भीय सर्वेक्षणांच्या मदतीने सरकारने आपल्या आदिवासी जमिनींमध्ये समृद्ध आणि दुर्मिळ खनिज संपत्तीचा खजिना शोधून काढला आहे . ही UCC म्हणजे काही नसून ती सर्व संसाधने बळकावण्याचे एक भंपक कारस्थान आहे .

UCC च्या अंमलबजावणीमुळे, अनुच्छेद ३७१ नुसार उत्तर-पूर्व नागालँडला दिलेल्या सर्व तरतुदी रद्द होतील. आदिवासींच्या जमिनींना लागू होणारे बहुतेक विशेषाधिकार देशाच्या इतर भागांमध्ये वाढवलेले नाहीत. हे सर्व विशेषाधिकार आपोआप रद्द होतील. किंबहुना आदिवासीची स्थिती त्याच्याच भूमीत परक्या माणसासारखी होईल .

हे पूर्ण झाल्यावर धरणे, अभयारण्ये, विशेष आर्थिक क्षेत्र आणि सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याच्या बहाण्याने आदिवासींना त्यांच्याच जमिनीतून बेदखल केले जाईल. स्वतःच्या भूमीतून हद्दपार झालेल्या याच आदिवासींना मोठ्या आणि महानगरांमध्ये कंत्राटी कामगार म्हणून काम करायला भाग पाडले जाईल .

पैशाचा आणि बळाचा वापर करुन सत्ताधाऱ्यांनी भारतीय लोकशाहीचे सर्व स्तंभ आधीच काबीज केले आहेत . .

UCC हा आपल्या संविधानाच्या आत्म्याला म्हणजेच गाभ्याला अंतिम धक्का असेल. UCC च्या पलीकडे संविधानात आत्मा नसलेल्या दृश्यमान संरचनेशिवाय काहीही राहणार नाही .

जर आपण UCC ला विरोध केला नाही आणि केवळ मुस्लिमांना त्याच्या विरोधात उभे राहू दिले तर संघी UCC ला मुस्लिम विरोधी कायदा म्हणून सादर करतील, बहुसंख्य समर्थन मिळवतील आणि अखेरीस हा कायदा मंजूर करण्यात यशस्वी होतील. शेतकऱ्यांनी जसे कृषी विधेयक अडवले तसे आपण स्वतः पुढे जाऊन UCC ला विरोध करणे आणि ते थांबवणे अत्यावश्यक आहे. अन्यथा हा कायदा आपल्या संविधानाला कॅन्सरसारखा खाऊन टाकील .

अलिकडच्या काळात असे दिसून आले आहे की मूळतः एससी, एसटी, ओबीसी विरुद्ध बनवलेले कायदे मीडिया आणि आयटी सेलद्वारे चुकीच्या पद्धतीने मुस्लिम विरोधी कायदे म्हणून चित्रित केले गेले आणि कालांतराने तेच कायदे आपल्याला लागू केले गेले.

CAA, NRC हे सवोत्तम उदाहरण आहे : एकट्या आसाममध्ये १४ लाखांहून अधिक अनुसूचित (SC) वर्गाचे लोक आणि OBC लोक CAA , NRC मुळे प्रभावित झाले आहेत आणि केवळ ५ लाख मुस्लिम प्रभावित झाले. कागदपत्रांमधील चुकांमुळे बहुतांश लोकांना त्रास सहन करावा लागला हे आपणा सर्वांना माहीत आहे.

मनुवाद्यांना हे चांगलेच माहीत होते की जे मुस्लिम नसून अशिक्षित आदिवासी आहेत त्यांच्याकडे नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी कागदपत्रे नाहीत. त्यांना चांगलं माहीत होतं की याचा परिणाम म्हणून सर्वात जास्त बाधित आणि निर्वासित होणारे स्थानिक आदिवासी असतील, मुस्लिम नाहीत .

त्यामुळे आम्ही आणि आमच्या आदिवासी संघटनांनी पुढे पाऊल टाकणे आणि णउउ ला लागू होण्यापासून रोखणे खूप महत्वाचे आहे कारण ही आमच्या आदिवासींसाठी ङ्गकरा किंवा मरोङ्ग परिस्थिती आहे

तेव्हा सर्व देशवासियांनो
सावधान !
सावधान !
सावधान !

**- प्रा .ए.एच.गेहलोत.**
प्रेषक-राज आझमगढी
समाजवादी बहुजन मोर्चा आझमगड, उत्तर प्रदेश.

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.१२ जुलै २०२३ ३

# शाळांसाठी अनुदान आले अन् गेले परत

## १.२७ कोटींचा निधी, शाळा खर्चाने वाढली मुख्याध्यापकांची डोकेदुखी

**गोंदिया:** शाळा चालविण्याकरिता सरकारी शाळांना शाळा अनुदान या ना-वाखाली आर्थिक वर्षात निधी देण्यात येतो. तो निधी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेतर्फे दिला जातो. २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी शिक्षण परिषदेने जिल्हा परिषदेला आणि जिल्हा परिषदेने पंचायत समितीला दिला. मात्र पंचायत समित्यांनी संबंधित शाळांना वेळेत तो निधी वळता केला नाही. परिणामी आर्थिक वर्षातील १ कोटी २७ लाख ९६ हजारांचा निधी पीएफएमएस प्रणालीद्वारे परत गेला. गतव-र्षीचाच शाळा अनुदान मिळाले नसल्याने आता चालू वर्षाचा खर्च कसा करावा, असा पेच मुख्याध्यापकांना पडला आहे.

शासन एका बाजूने शिक्षण हक्क कायद्याच्या नावावर प्राथमिक शिक्षण सार्वजनिक करीत आहे. पण दुसऱ्या बाजूने प्राथमिक शाळांची अवस्था विना अनुदानाने खूप वाईट होत चालली आहे. इंग्रजी शिक्षणाच्या नावावर शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांकडे दुर्लक्ष होत आहे. मागील सत्रातील व चालू सत्रातील सर्व शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद शाळांचा अनुदानाची रक्कम मिळाली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळा आर्थिक अडचणीत सापडल्या आहेत.

मागील वर्षाची सर्व शिक्षा अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेचा निधी पंचायत समितीला येऊन सुद्धा पंचायत समितीच्या ढिसाळ नियोजनामुळे सर्व शिक्षा अभियानाचा निधी परत गेला. हा प्रकार सर्वच पंचायत समित्यांतील आहे. शाळांनाही रक्कम मिळाली नसल्यामुळे मागच्या वर्षीचे बिल जसेच्या तसे पडून आहेत. शाळांना साधी लवारची रक्कम न मिळाल्यामुळे, आता शाळा चालवायच्या कशा असा प्रश्न मुख्याध्यापक विच-ारत आहेत. याबाबद संघटनांनी वारंवार निवेदने देऊनही टाळाटाळीची उत्तरे अधिकारी देत असल्याचा आरोप संघटनांचा आहे.

शिक्षण परिषदेने प्राथमिक शाळांसाठी १ कोटी ४६ लाख ४५ हजार रुपयापैकी १ कोटी १७ लाख १६ हजार, तर माध्यमिक शाळांसाठी १३ लाख ५० हजार रुपयापैकी १० लाख ५० हजार रुपये निधी शिक्षण परिषदेने परत घेतला. परिणामी आता शिक्षकांची शाळा अनुदानासाठी ओढताण सुरु झाली आहे. सादिलवार व सर्व शिक्षा अभियानाची रक्कम सडक अर्जुनी तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील बऱ्याच शाळांना न मिळाल्याने मुख्याध्यापकांना व शिक्षकांना स्वत:च्या पगारातून शाळा चालवाव्या लागत आहेत. त्यामुळे प्रभारी मुख्याध्यापकाचा कार्यभार घ्यायला कोणीही तयार होत नाही.



### अनेक शाळांचा वीजपुरवठा खंडित

**डिजिटल शाळा झाल्या पण शाळांमध्ये पैसे नसल्यामुळे व वारंवार मागणी करुन सुद्धा ग्रामपंचायतीने शाळांचे वीज बिल भरले नाही. त्यामुळे शाळांचा वीज पुरवठाही खंडित करण्यात आला आहे. म्हणून आता डिजिटल शाळा नावालाच असल्याचे दिसत आहे. वीज मोटारपंद बंद असल्याने विद्यार्थ्यांना हातपंप आणि विहिरीचे पाणी घ्यावे लागत आहे. प्रत्येक शाळेत शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जाते. मागील वर्षाचा विचार केला तर शासन दराप्रमाणे जेवढे बिल होते. तेवढी रक्कम शाळांना मिळायला हवी होती. परंतु वरिष्ठ प्राथमिक शाळांना जवळपास ३० ते ३५ हजार रुपये मिळाले आहेत. या परिस्थितीत मुख्याध्यापकांनी शालेय पोषण आहार योजना कशी चालवावी हे न उलगडणारे कोडे आहे.**

### निधीची उपलब्धता व परत गेलेला निधी

| तालुका | जिपला मिळालेला निधी प्राथमिक | जिपला मिळालेला निधी माध्यमिक | परत गेलेला निधी प्राथमिक | परत गेलेला निधी माध्यमिक |
|---|---|---|---|---|
| अर्जुनी मोरगाव | 17225000 | 125000 | 1378000 | 100000 |
| आमगाव | 1552500 | 62500 | 1242000 | 50000 |
| देवरी | 1532500 | 225000 | 1226000 | 180000 |
| गोंदिया | 3295000 | 350000 | 2636000 | 280000 |
| गोरेगाव | 1585000 | 50000 | 1268000 | 40000 |
| सडक अर्जुनी | 1465000 | 137500 | 1172000 | 110000 |
| सालेकसा | 1360000 | 150000 | 1088000 | 120000 |
| तिरोडा | 2132500 | 250000 | 1706000 | 200000 |
| एकूण | 14645000 | 1350000 | 11716000 | 1080000 |

### निधी येताच दिला जाईल

**शाळांनी वेळेत बिल सादर केले नाही. तसेच शिक्षण परिषद खर्च न झालेले पैसे परत घेते. तसाच प्रकार घडला आहे. शिक्षण परिषदेकडे निधीची मागणी करण्यात आली आहे. निधी येताच शाळांना देण्यात येईल, हा प्रकार फक्त गोंदियात नव्हे तर राज्यात सगळीकडेच आहे.**

**महेंद्र गजभिये, शिक्षणाधिकारी प्राथमिक**

# राज्यात चौथ्या क्रमांकाचे सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे ठरले अर्जुनी/मोरगाव

**गोंदिया:** कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, दोषसिध्दी यामध्ये सुधारणा व्हावी यासाठी देशपातळीवर १० सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांची (Best Police Station) म्हणून निवड करण्याबाबतचा निर्णय केंद्रीय स्तरावर घेण्यात आला होता. त्याप्रमाणे सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांची निवड भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडून करण्यात आली असून गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव पोलीस ठाणे हे जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे राज्यातील पहिल्या पाच उत्कृष्ठ पोलीस ठाण्यात आल्याने जिल्ह्यातील उत्कृष्ठ ठाणे ठरले आहे.

सदर स्पर्धेमध्ये राज्यातील पोलीस ठाण्यांची कार्यक्षमता आणि कामगिरी वाढविणे, गुणवत्ता वाढविणे दिलेल्या मर्यादेमध्ये उत्कृष्ट पध्दतीने काम करणे, तसेच गुन्हेगारीला प्रतिबंध आणि गुन्हयाचा तपास, आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने संबंधित पोलीस अधिकारी/अंमलदार यांना प्रोत्साहित करणे, इत्यादी हेतू साध्य करण्यासाठी सन २०२० या वर्षापासून राज्य पातळीवर सर्वोत्कृष्ट ५ पोलीस ठाण्यांची निवड करुन सदर पोलीस ठाण्यांना सन्मानचिन्ह व रोख बक्षिस प्रदान करण्यात येते. त्याच धर्तीवर सन- २०२१ या वर्षातील कार्यमुल्यांकनाच्या बाबतीत राज्य पातळीवर सर्वोत्कृष्ट पोलिस ठाणे स्पर्धेकरीता ५ सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे निवडण्यासाठी राज्य स्तरावर समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. त्या समित्यांनी आपला निकाल जाहीर केला आहे.

त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील ५ पोलीस स्टेशनची निवड करण्यात आली असून त्यात शिवाजीनगर पोलीस ठाणे (कोल्हापूर),देगलुर पोलीस ठाणे (नांदेड),वाळुंज पोलीस ठाणे (छत्रपती संभाजी नगर शहर),अर्जुनी मोर पोलीस ठाणे (गोंदिया) व राबोडी पोलीस ठाणे (ठाणे शहर) चा समावेश आहे.

सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे म्हणून घोषीत करण्यात आलेल्या ५ पोलीस ठाणे पैकी गोंदिया जिल्ह्यातील पोलीस ठाणे अर्जुनी मोर पोलीस स्टेशनने गोंदिया जिल्हा दलाचा संपूर्ण देशात व राज्यात नावलौकिक वाढवीला आहे. संपूर्ण गोंदिया जिल्हा पोलीस विभागाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांनी पोलीस ठाणे अर्जूनी मोरगाव येथील अधिकारी-अंमलदार यांचे कार्याचे कौतुक केले आहे.



### पोलिसांचा सत्कार

**२०२१ चे काळात कार्यरत पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन जिल्हाधिकाऱ्यांनी सत्कार केला. यात पोलिस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी, विलास नाडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम, संभाजी तागड, अमलदार रमेश सेलोकर, जानकाबाई नरेटी, दिलीप वाढई, राहूल चिचमलकर, कैलास यादव, रोशन गोंडाने, प्रल्हाद खोटेले, विजय कोटांगले, आनंद भोयर, किरण गायकवाड, गीता ठाकुर, श्रीकांत मेश्राम, गौरीशंकर कोरे, प्रवीण बेहरे व पुंडलिक राऊत यांचा समावेश आहे. राज्यसेवा परीक्षेत यश संपादन करणारी खुशबू बरेय्या, वडील प्रल्हाद यांचाही सत्कार करण्यात आला. माजी नगराध्यक्ष पोर्णिमा शहारे यांनी खुशबूला भारतीय संविधानाची प्रत भेट म्हणून दिली.**

### १२०० पोलिस ठाण्यात पहिले येणे ही मोठी गोष्ट

**पोलिस अधीक्षक पिंगळे म्हणाले, ही कामगिरी अत्यंत कौतुकास्पद आहे. राज्यातील १२०० पेक्षाही अधिक पोलिस ठाण्यात पहिले येणे खूप मोठे आहे. निरंतर चालत राहिले पाहिजे असा सल्ला देत पुन्हा टॉप फाईव्हमध्ये कसे राहू यासाठी अंमलदारांनी प्रयत्नशील असावे. या यशात पत्रकारांचेही योगदान मोठे आहे. त्यांचेही कौतूक केले.**

# गोंदियाची हळद निर्यातदारांमार्फत दुबईच्या बाजारात

**गोंदिया :-** भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशाची अर्थव्यवस्था ज्याप्रमाणे शेतीवर अवलंबून आहे त्याचप्रमाणे देशातील बहुतांशी जनता देखील ही शेतीच्या व्यवसायावर अवलंबून आहे. देशाला खऱ्या अर्थाने जागतिक महासत्ता व्हायचं असेल तर देशाच्या अर्थव्यवस्थेला मजबूत करावे लागेल. यासाठी शेतकऱ्यांनी शेती व्यवसायाला केंद्रबिंदू मानून मोठे उद्योजक व्हावे. असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले.

कृषी विज्ञान केंद्र, महिला अर्थिक विकास महामंडळ (माविम) आणि फॅरेश इंटरनॅशनल प्रा.लि. पुणे यांनी कृषी विज्ञान केंद्र हिवरा येथे शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या खरेदीदार विक्रेत्याच्या मेळाव्यात अटारी, पुणेच्या आदिवासी उपयोजना (टीएसपी) अंतर्गत "व्हॅल्यू चेन मॅनेजमेंट आणि हळदीची निर्यात" या विषयावर नुकतेच एक दिवसीय "जागृती कार्यक्रम कम कार्यशाळा" आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी डॉ.पंजाबराव कृषि विद्यापीठ अकोल्याचे नियंत्रक डॉ.प्रमोद पाटील नियंत्रक, नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक अविनाश लाड, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर, आत्माचे प्रकल्प संचालक अजित अडसुळे, हुजेफा कपाडिया व अजीज बेटमावाला संचालक फॅरेश इंटरनॅशनल प्रा.लि. पुणे, श्री. महेंद्र ठाकूर अध्यक्ष शेतकरी शास्त्रज्ञ मंच, प्रवीणकुमार चौधरी सह-अध्यक्ष शेतकरी वैज्ञानिक मंच, डॉ. सय्यद शाकीर अली वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृषी विज्ञान केंद्र गोंदिया, डॉ. विजयकुमार कोरे एसएमएस (हॉर्टिकल्चर), विशाल उबरहंडे एसएमएस (एग्रील. इंजी.), मनोज भोमटे एसएमएस (एग्रो), डॉ. कल्याणी सरप एसएमएस (एएचडीएस) उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गोतमारे यांनी केव्हीके गोंदियाने शेतकरी बांधवांच्या हितासाठी केलेल्या कार्याचे कौतुक केले. जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या विविध अनोख्या उत्पादनांची प्रक्रिया, पॅकिंग, ब्रँडिंग आणि मार्केटिंग करण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्नशील असायला पाहिजे, जेणेकरुन आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत बाजारपेठेत निर्यातदारांमार्फत मार्केटिंग करुन त्याचे उच्च मूल्य मिळविता येईल. पीक वैविध्य आणणे आणि त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सर्व विभाग आणि कृषी विज्ञान केंद्र यांच्याकडे उपलब्ध असलेल्या योजनांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे सांगून त्यांनी ईशान्येकडील प्रदेशातील त्यांच्या कामाची विविध उदाहरणे दिली आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी अशा प्रकारच्या उपक्रमात सहभागी होण्यास सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सय्यद शाकीर अली यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाविषयी संपूर्ण माहिती दिली आणि कृषी आणि संलग्न उद्योगांकडून अधिक नफा मिळविण्यासाठी विविध पिकांची मूल्यसाखळी अत्यंत महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले. गेल्या सहा महिन्यांपासून केव्हीके तुरीच्या निर्यातीचे नियोजन करत असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यांनी प्रक्रिया, पॅकिंग, ब्रँडिंग आणि विपणन यावर प्रकाश टाकला आणि शेतकऱ्यांना अधिक बाजारपेठ आणि नफा मिळवून देणारी पिके घेण्याचे सूचित केले. गोंदियातील हळद निर्यातदारांमार्फत थेट दुबईला बाज-ारात आणता यावी यासाठी घतघ ने दुबई आणि पुणे येथील निर्यातदारांना आमंत्रित केले आहे. तसेच भारता-तील केव्हीके प्रणाली आणि त्याच्या आदेशाबाबत माहिती दिली.

संजय संगेकर यांनी महिला आर्थिक विकास महामंडळाबद्दल माहिती दिली आणि सर्व शेतकऱ्यांना विविध उत्पादने निर्यातदारांना उप-लब्ध करून देण्याची सूचना केली, जेणेकरून त्यांना मध्यस्थाशिवाय सर्व उत्पादनांना बाजारपेठ मिळेल असे सांगितले.

अजित अडसुळे यांनी पीएमएफएमई, कृषी यांत्रिकीकरण व इतर योजनांबाबत मार्गदर्शन केले व शेतकरी बांधवांच्या हितासाठी आत्मा गोंदिया मार्फत राबविल्या जाणाऱ्या संपूर्ण योजना व उपक्रमांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे सुचविले. त्यांनी विविध प्रकल्प विशेषत: राज्य कृषी विभागाच्या स्मार्ट प्रकल्पाची उदाहरणे दिली. विभागाकडून शेतकऱ्यांना कशी मदत होत आहे याबाबत माहिती दिली.

अविनाश लाड यांनी शेतकऱ्यांना वेगवेगळ्या हंगामात तेलबिया आणि कडधान्य पिकांची लागवड करून लागवडीखालील क्षेत्र वाढविण्याची सूचना केली. सर्व FPC सदस्यांना FPC स्तरावर तेल उत्खनन युनिट सुरू करू इच्छित असल्यास नाबार्ड नक्कीच मदत करेल असे सुचविले.

अजीज बेटमावाला यांनी आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत बाजारपेठेतील विविध उत्पादनांच्या आवश्यकतेची माहिती दिली व शेतकऱ्यांना भेसळविरहित शुद्ध उत्पादन देण्याची सूचना केली.

हुजेफा कपाडिया यांनी गोंदियाने आंतरराष्ट्रीय स्तरावर हळद निर्यात करण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि सर्व शेतकरी आणि सर्व सदस्यांना त्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी जास्तीत जास्त अद्वितीय साहित्य उपलब्ध करून देण्याची सूचना केली. मध आणि त्याची द्विउत्पादने घेऊन येण्याचे निमंत्रणही त्यांनी शेतकऱ्यांना दिले, जेणेकरून त्याचे मार्केटिंग त्यांच्या कंपनीमार्फत करता येईल असे सांगितले.

महेंद्र ठाकूर यांनी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाने गेल्या ६ महिन्यांपासून राबविलेल्या उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी सर्व शेतकऱ्यांना घतघ प्लेटफॉर्मचा लाभ घेण्यास सुचविले. ज्याने शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन थेट दुबईला बाजारात आणण्यास मदत केली, कारण ही शेतकरी शास्त्रज्ञ मंचाद्वारे खरेदीदार विक्रेता बैठक आहे असे त्यांनी सांगितले.

संतोष बिसेन, प्रगतीशील शेतकरी आणि उद्योजक यांनी खत्रङ्क मॉडेल आणि गांडूळखताबद्दलचा त्यांचा अनुभव सांगितला आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी पर्यायी पीक आणि संबंधित उद्योगाकडे जाण्याची सूचना केली.

तांत्रिक सत्रादरम्यान, अनुभवांची देवाणघेवाण आणि विविध प्रश्नांचे निराकरण सर्व शास्त्रज्ञ आणि मान्यवरांनी केले. एकूण २ टन हळदीच्या निर्यातीसाठी माविम आणि एफपीओच्या ५ विविध गटांना २ लाख ८० हजाराचे धनादेश मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. सर्व महिला शेतकरी, FPO, SHG आणि शेतकरी वैज्ञानिक मंचाच्या सदस्यांना धनादेश मिळाल्याने खूप आनंद झाला आणि घतघ गोंदियाने घेतलेल्या पुढाकाराचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. विजयकुमार कोरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार गणेश खेडीकर यांनी मानले. एकूण १२५ शेतकरी, शेतकरी महिला, माविमच्या महिला, उद्योजक, महिला बचत गट, शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य आणि FPO, अधिकारी आणि घतघ चे सर्व कर्मचारी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.



## हत्तीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई त्वरित द्यावी-जि.प.उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणविर

**अर्जुनी मोरगाव**-गेल्या काही दिवसांपासून गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यात हत्तींचा हैदोस सुरु आहे.हत्तींच्या या हैदोसामुळे तालुक्यातील शेतकरी त्रस्त झाले आहेत.उमरपायली येथे पहाटेच्या सुमारास धान पिकाच्या पऱ्याची पायाने तुडवून नाशधुस केली.केळींचे झाड सोंडाने तोडुन टाकले व घरासमोर ठेवलेली मोटारसायकल चकनाचुर केली.

घटनेची माहिती मिळताच जि.प.उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणविर उमरपायली गाव गाठले व मौक्यावर जाऊन पाहणी केली.इतका विनाशक दृश्य दोन तीन दिवसांनी रोवणी करायची अशा प?्यांची पायाने तुडवून ना-सधुस केली.या शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी मौक्यावरुन संपर्क साधला आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असे आवाहन त्यांनी केले.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जाती दावा पडताळणीसाठी विशेष मोहीम

**गोंदिया:-** समाज कल्याण विभागांतर्गत ङ्गराजर्षि शाहू महाराजङ्क यांचा जन्मदिन २६ जुन २०२३ पासून ते २६ जुलै २०२३ पर्यंत हा कालावधी ङ्गराजर्षि शाहू महाराज समता पर्वङ्क म्हणून साजरा करण्यात येत आहे. सदर कालावधीत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया अंतर्गत सन २०२३-२४ या सत्रात जेईई, नीट व सीईटी अंतर्गत वैद्यकीय, फार्मसी, अभियांत्रिकी, आर्किटेक्ट, विधी पदवी, बी.एड., व्यवस्थापन (एमबीए, एमसीए) यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश परीक्षेत गुणांकनासह सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश प्रक्रिया पात्रता फेरीकरीता जे मागासवर्गीय विद्यार्थी पात्र ठरले आहेत मात्र त्या विद्यार्थ्यांचे जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव समितीकडे तृटी पूर्ततेसंदर्भात प्रलंबीत आहेत अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जाती दावा पडताळणी संदर्भात विशेष मोहीम हाती घेण्यात आल्याची माहिती उपायुक्त तथा समिती सदस्य राजेश पांडे यांनी दिली.

विद्यार्थ्यांना त्यांचे प्रकरणातील तृटीबाबत एसएमएस, ई-मेल तथा पत्राद्वारे कळविण्यात आले. आई-वडिलांनी समिती कार्यालयात या कालावधी दरम्यान उपस्थित राहून तृटी पुर्तता करावी. त्रयस्थ व्यक्तिमाफ'त सादर करण्यात येऊ नये.

## महिला आर्थिक विकास महामंडळाने गाठला १०० कोटीचा टप्पा

**गोंदिया :-** माविम मुख्यालय यांच्या मार्गदर्शनानुसार गोंदिया जिल्ह्याचा वर्ष २०२३-२४ चा क्रेडीट प्लॅन सेमिनार माविम जिल्हा कार्यालयाच्या प्रशस्त हॉलमध्ये आयोजित करण्यात आला. यावेळी प्रामुख्याने ऑनलाइन पध्दतीने राजु इंगळे, विभागीय सनियंत्रण व मूल्यमापन अधिकारी माविम नागपुर विभाग, अविनाश लाड, सहा.महाप्रबंधक नाबार्ड गोदिया, रोशन पंचबुद्धे प्रभाकर मिश्रा हरिश युगल कटरे श्री रामटेके श्री कुणाल, एस.एस. छापरे, स्वरुप कटरे, भूपेंद्र नायडू व स्वाती चौहाण स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्यासह जिल्ह्यातील जिल्हा स्टाफ उपस्थित होते.

# पोलीस दादालोरा खिडकी योजनेंतर्गत बिचटोलावासियांना धान बीजाईचे वितरण

**गोंदिया:-** पोलीस विभागाच्या "पोलीस दादालोरा खिडकी" योजनेच्या माध्यमातून "एक हात मदतीचा' योजने अंतर्गत देवरी तालुक्यातील पोलीस स्टेशन चिचगड अंतर्गत येत असलेल्या अजझ पिपरखारी येथे नक्षलग्रस्त आदिवासी भागातील बिचटोला येथील पुरुष व महिला शेतकर्यांना धान बीजाईचे वितरण करण्यता आले.

पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या हस्ते पेरणीच्या अनुशंगाने साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, यांनी या भागातील शेतकऱ्यांना शेतीविषयक पारंपारिक शेती सोबत आधुनिक शेतीला प्राधान्य द्यावे व शासनाच्या कृषी विषयक विविध योजना पोलीस विभाग "पोलीस दादालोरा खिडकी" च्या माध्यमातून आपल्या दारी पोहोचविण्यासाठी सदैव प्रयत्नशील असल्याची ग्वाही दिली. त्याचबरोबर नवनिर्मित सशस्त्र दुरक्षेत्र ङ्गपिपरखारीङ्क येथे पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येवून अनेक प्रकारचे वृक्ष लावण्यात आलेत.यावेळी ङ्गबीचटोलाफ पिपरखारी येथील ग्रामस्थ, शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सदर कार्यक्रमाला पोलीस स्टेशन चिचगडचे प्रभारी शरद पाटील, अजझ पिपरखारी प्रभारी जानकार, पोलीस उपनिरीक्षक मटामी, पोलीस स्टाफ तसेच परिसरातील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पान १ वरुन

त्या अपिलावर सुप्रीम कोर्टात आज सुनावणी झाली. यावर सुप्रीम कोर्टाने याचिकाकर्त्यांना आपली याचिका परत घेण्यास सांगितले आहे. त्यामुळे आता आमदार नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे.महाविकास आघाडीच्या उद्धव ठाकरे सरकारने १२ आमदारांची यादी दिली होती. मात्र तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी त्यावर कोणताच निर्णय घेतला नाही. सरकार बदलल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवीन यादी पाठवली. राज्यपालांनी घटनेची पायमल्ली केलीय, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे होते. तत्कालीन उद्धव ठाकरे सरकारने दिलेली मूळ यादीच कायम ठेवावी अशी मागणीही त्यांनी केली होती.

# भरधाव वाहन चालविणे १०१ जणांना पडले महागात

**गोंदिया:** जिल्ह्यातील अपघाताचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन नागरिकांमध्ये विशेषत: गोंदिया शहरातील नवतरुण - तरुणी आणि जनतेमध्ये वाहतुकीच्या नियमांची जागृती व्हावी, वाहतुकीला शिस्त लागावी, वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी, याकरिता पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी अभियान सुरू करण्याचे निर्देश दिले होते.

भरधाव वेगात वाहन चालवून लोकांच्या जिवाला धोका निर्माण करणाऱ्यांविरूद्ध दोन दिवसात कारवाई करून १०१ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

गोंदिया जिल्ह्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध २४ व २५ जून रोजी कारवाई करण्यात आली. हलगर्जीपणे वाहन चालविणे, लापरवाहीने भरधाव वेगात वाहन चालविणे, विरुध्द दिशेने गाडी चालविणे अशा लोकांवर भादंविच्या कलम २७९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

गोंदिया जिल्हा पोलिस प्रशासन जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी व गोंदियाकरांचा त्रास कमी करण्याकरिता कटिबध्द असल्याचे पोलिस विभागाने म्हटले आहे. सर्व पोलिस ठाणे, वाहतूक शाखा, जिल्ह्यातील वाहतूक रहदारीचे योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करून सदैव प्रयत्नशील आहेत.



### हलगजीपणे वाहन चालविणाऱ्यांवर दोन दिवसात दाखल केलेले गुन्हे

| पोलिस ठाणे | दाखल गुन्हे | पोलिस ठाणे | दाखल गुन्हे |
|---|---|---|---|
| गोंदिया शहर | ०७ | गोरेगाव | ०९ |
| गोंदिया ग्रामीण | ११ | सालेकसा | ०२ |
| रावणवाडी | ०२ | देवरी | ०४ |
| तिरोडा | ११ | डुग्गीपार | १० |
| गंगाझरी | ०३ | अर्जुनी / मोरगाव | ०६ |
| दवनीवाडा | ०८ | नवेगावबांध | ०७ |
| आमगाव | १० | केशोरी | ०६ |
| | | चिचगड | ०५ |

### अल्पवयीन मुलांनी नियमांचे पालन करावे

**गोंदिया जिल्ह्यातील नागरिकांना विशेषत: अल्पवयीन मुले - मुली, शाळकरी विद्याथी आणि त्यांचे पालक यांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. अन्यथा वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाईला सामोरे जावे लागू शकते.**

### नियम तोडणाऱ्या ९० जणांना दिले गुलाबाचे फूल

**पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्या संकल्पनेतून गोंदिया शहरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणारे सिग्नल तोडणारे, विरूद्ध दिशेने गाडी चालविणारे अशा ९० जणांना जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेतर्फे गुलाबपुष्प देत वाहतूक नियम सांगण्यात आले.**


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदिया

### ई-निविदा सुचना क्र.१५ सन २०२३-२०२४ (प्रथम मागणी)

गोंदिया पाणी पुरवठा योजना, देखभाल व दुरुस्ती अंतर्गत गोंदिया येथील तुकडोजी नगर (पांगोली रोड) येथे १० mm ६ Kg/Sqm HDPE पाईप लाईन टाकण्याबाबतच्या कामाची निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रू.७,४६,७५२/- आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दिनांक १०/०७/२०२३ ते दि.२४/०७/२०२३ पर्यंत विभागीय कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

**कार्यकारी अभियंता**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

# ओबीसी विद्यार्थी वसतिगृहाच्या अडचणी तातडीने दूर करा-मंत्री अतुल सावे

**मुंबई :** इतर मागास प्रर्वगातील विद्यार्थ्यांना प्राधान्याने वसतिगृह उपलब्ध करुन देण्यात असलेल्या अडचणी तातडीने दूर करुन या कामाला अधिक गती द्यावी, असे निर्देश इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिले.

सहकार व इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री श्री. सावे यांच्या अध्यक्षतेखाली विभागाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मंत्री श्री. सावे यांनी हे निर्देश दिले. यावेळी इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सचिव सुमंत भांगे, संचालक, प्रादेशिक उपसंचालक व सर्व सहाय्यक आयुक्त संबंधित तसेच




अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. सावे म्हणाले की, इतर मागास प्रर्वगातील मुला-मुलींसाठी ३६ वसतिगृहे सुरु करण्याबाबत जागा उपलब्ध होत नसेल, तर संबंधित जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकारी यांच्याशी समनव्य साधून यावर तातडीने मार्ग काढावा. तसेच इतर मागास प्रर्वगातील मुला-मुलींसाठी ७२ वसतिगृहे सुरु करण्यासासाठी इमारती भाड्याने घेण्यात ज्या अडचणी आहेत, त्या तातडीने दूर कराव्यात.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधारणा योजना, आश्रमशाळांच्या संच मान्यता, बंद पडलेल्या आश्रमशाळांचा आढावा, धनगर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश देणे, धनगर समाजाच्या विकासासाठीच्या विशेष योजना, कन्यादान योजना, मॅट्रिकोत्तर व मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेच्या प्रलंबित प्रकरणांचा जिल्हानिहाय व वर्षनिहाय माहितीसह आढावा, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या इतर योजना, याबाबत जिल्हानिहाय आढावाही मंत्री श्री. सावे यांनी या बैठकीत घेतला.

# विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन १७ जुलैपासून

**मुंबई: :** राज्य विधिमंडळाचे सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन १७ जुलै ते ४ ऑगस्ट २०२३ या कालावधीत मुंबई येथे होणार आहे. याबाबतची घोषणा विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या आज झालेल्या बैठकीत विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी, तर विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.



विधानभवनात पार पडलेल्या या बैठकीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, यांच्यासह विधानसभा सदस्य सर्वश्री छगन भुजबळ, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, गिरीष महाजन, अशोक चव्हाण, उदय सामंत, अमिन पटेल, आशिष शेलार, नरहरी झिरवाळ, तसेच विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह विधानपरिषद सदस्य सर्वश्री ॲड.अनिल परब, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, शशिकांत शिंदे, विकास पोतनीस, कपिल पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील, संसदीय कार्य विभागाचे सचिव सतीश वाघोले, विधानसभा सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे, विलास आठवले, वित्त विभागाच्या सचिव श्रीमती शैला ए., यांच्यासह संबंधित उपस्थित होते.

विधिमंडळाच्या शतकोतर प्रवासाच्या पार्श्वभूमीवर विधिमंडळ वाटचालीचे दस्ताऐवजीकरण करण्याचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सूचित केले. विधिमंडळाचा गौरवशाली इतिहास संदर्भग्रंथाच्या माध्यमातून जतन करण्याचे तसेच विविध परिसंवादाद्वारे विधिमंडळाच्या आजपर्यंतच्या कामकाजातून महत्त्वपूर्ण घटना, प्रसंगांना उजाळा देणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करण्याची उपसभापती डॉ.गोऱ्हे यांनी सूचना मांडली.मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवानिमित्तच्या पार्श्वभूमीवर अभिनंदनाचा ठराव अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात सादर करण्याबाबत जयंत पाटील, अशोक चव्हाण, बाळासाहेब थोरात यांनी मांडलेल्या सूचनेवर अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी यावेळी संमती दर्शवत ठराव मांडण्याचा निर्णय घेतला. दिनांक १७ जुलै ते ४ ऑगस्ट या १९ दिवसांच्या कालावधीतील अधिवेशनाचे प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस १५ असून चार दिवस सार्वजनिक सुट्ट्यांचे (शनिवार, रविवार) असणार आहेत.

# फुलचूर नगत पंचायतचा प्रस्ताव रेंगाळला

### सर्वपक्षीय नेत्यांचे प्रयत्न निष्फळ: शासनाकडून अपेक्षा बळावल्या

**गोंदिया:** शहरालगतच्या आणि मोठ्या प्रमाणात वसाहतीकरण झालेल्या फुलचूर आणि फुलचूरटोला या ग्रामपंचायतींना नगरपंचायतीची प्रतीक्षा आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभागाच्या २७ जुलै २०२० च्या निर्णयानुसार गोंदिया नगर परिषदेत गोंदिया (बु.), गोंदिया (खु.), कटंगीकला, कुडवा, नंगपुरा मुर्री आणि पिंडकेपार या सहा गावांचा समावेश केला होता. गोंदिया नगर परिषदेत फुलचूर आणि फुलचूरटोला या गावांचा समावेश झाला नाही. माजी जि.प. सदस्य राजेश चतुर यांनी वर्षभरापुर्वी आंदोलनाचाही इशारा दिला होता. फुलचूर व फुलचूरटोला ही दोन्ही गावे गोंदिया नगर परिषदेत विलीन केली नाहीत.




महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या पोटकलम (१) च्या कलम ३४१ (१ अ) नुसार, फुलचूर आणि फुलचूरटोला ही जिल्हा मुख्यालयाची जागा असल्याने नियमानुसार नगरपंचायत बनविणे बंधनकारक आहे. असा प्रस्ताव जिल्हा दंडाधिकारी गोंदिया यांनी २५ जानेवारी २०२२ ला महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे. मात्र तो अद्यापही प्रस्ताव रेंगाळलेल्या स्थितीतच आहे. माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आमदारांनी शासनाकडे पत्रव्यवहारही केला होता. त्यामुळे आता शासन कधी निर्णय घेते, याची प्रतीक्षा दोन्ही गावांना नगरपंचायतला आहे. जेणेकरुन दोन्ही गावांचा सर्वांगिण विकास लवकर होईल.

## भंडारा एसडीओ राठोडसह दोन तहसिलदार निलंबित

**भंडारा:-** भंडारा जिल्ह्यातील भंडारा उपविभागातंर्गत येत असलेल्या भंडारा व पवनी तालुक्यातील पोलीस पाटील व कोतवाल भरती प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी केलेल्या चौकशीत त्रुट्या आढळून आल्याने विभागीय आयुक्तांच्या सुचनेवरुन पालघर येथील विद्यमान रोहयो उपजिल्हाधिकारी व भंडाराचे तत्कालीन उपविभागीय अधिकारी रविंद्र राठाडे यांच्यासह भंडारा तहसिलदार अरविंद हिंगे व पवनीच्या तत्कालीन तहसिलदार निलिमा रंगारी यांना निलबिंत करण्यात आले आहे.महसुल व वनविभागाचे अवर सचिव संजीव राणे यांच्या स्वाक्षरीने २७ जून रोजी निलबंनाचे आदेश काढण्यात आले.यामध्ये भंडारा उपविभागीय अधिकारी कार्यालयातंर्गत झालेल्या पोलीस पाटील भरतीमध्ये अनियमिततेसंदर्भात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी भंडारा प्राथमिक चौकशी केली असता या चौकशीत तक्रारीत तथ्य आल्याचे २० जून रोजी विभागीय आयुक्त कार्यालयाने सादर केलेल्या अहवालात म्हटले गेले.

# गुदमा येथे रस्ता, नाली बांधकामात घोळ

### निकृष्ट साहित्याचा वापर, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार



**गोंदिया:** तालुक्यातील गुदमा येथे स्थानिक आमदार निधीतून मंजूर रस्ता व नालीचे बांधकाम करण्यात आले. मात्र, सदर कंत्राटदाराकडून बांधकामात घोळ झाला असून बांधकामात अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्यांचा वापर होत असल्याचे आरोप गावकऱ्यांनी केला आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन कंत्राटदारावर कारवाईची मागणी केली आहे.

गोंदिया विधानसभा क्षेत्रातील गुदमा येथे स्थानिक आमदार निधीतून रस्ता व नाली बांधकाम मंजूर करण्यात आले. यानुसार प्यारेलाल ब्राम्हणकर ते डोमेश थेर यांच्या घरापर्यंत नालीचे बांधकाम, दयालदास वाढई ते बासीपार जाणारा रस्ता, खुशाल शेंडे यांच्या घरापासून सिमेंट रस्त्यापर्यंत रस्ता तर राधेश्याम ब्राम्हणकर ते शेवटपर्यंत रस्ता तयार केला आहे. हे काम करताना ग्रामपंचायतीची परवानगी न घेता मनमर्जीने काम करुन कंत्राटदार मोकळा झाला आहे. मात्र, हे कामही अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. यामुळे कामाच्या गुणवत्तेवर गावकऱ्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

यामुळे संबंधितांनी भ्रष्टाचार केल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. या संदर्भात कामाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी गुदमावासीयांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

निवेदन देतेवेळी माजी सरपंच दयालदास वाढई, लखनलाल वाढई, ग्रा.पं.सदस्य ममता ब्राम्हणकर, आशा ब्राम्हणकर, कल्पना धुर्वे, करिश्मा गजभिये, सामाजिक कार्यकर्ता हमसलाल ब्राम्हणकर, सुनील धुर्वे. जाकिर खान पठान, राजेश ब्राम्हणकर, अरुण साऊतकर यांच्यासह गावकरी उपस्थित होते.



# सालेकसात बाजार समिती स्थापन करा



**सालेकसा:** शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल विक्री करण्यासाी बाजार समिती प्रमुख घटक आहे. मात्र स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही आदिवासी, दुर्गम, नक्षलप्रभावित जंगलव्याप्त सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी पायपीट करावी लागत आहे. बाजार समिती अभावी शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल अल्प किमतीत विकावा लागतो. शेतकऱ्यांच्या हितासाठी सालेकसा येथे कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याची मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधक यांच्यामार्फत शासनाला पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

सालेकसा येथे कृषी उत्पन्न बाजार समिती नसल्यामुळे शेतकऱ्यांना अल्प किमतीत शेतमाल विकावा लागतो. बाजार समिती अभावी शासनाच्या विविध योजनाचा लाभ देखील शेतकऱ्यांना घेता येत नाही. अल्प किमतीत शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादीत केलेला शेतमाल विक्री करावा लागतो. सालेकसा तालुका आदिवासी, दुर्गम, जंगलव्याप्त नक्षलग्रस्त आहे. तालुक्यात ४१ ग्रामपंचायती व ९२ गावांचा समावेश आहे. शासनाचे धोरण शेतकरी हिताचे असले तरी दुसरीकडे तालुक्यात बाजार समिती नसल्याने शेतकऱ्यांची बोळवण होत आहे. तालुक्यात ९० टक्के लोक शेती करुन उपजिवीका करीत आहेत.

शेतकऱ्यांना शेतमाल विक्री करण्यासाठी ३० ते ५० किमी अंतरावरील आमगाव कृषी उत्पन्न बाजार समिती गाठावी लागते. यात शेतकऱ्यांना शारीरिक, मानसिक, त्राससह आर्थिक भुर्दंडही बसतो. शेतकऱ्यांचा त्रास टाळण्यासाठी व त्यांच्या उत्पादित मालाला योग्य दर मिळण्यासाठी सालेकसा येथे कायमस्वरुपी कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या आशयाचे निवेदन देताना उपनिबंधकांना देण्यात आले. निवेदन देताना ब्रजभुषणसिंग बैस, हिरालाल साठवणे, घनश्याम बहेकार, यशवंत शेंडे, बाजीराव तरोणे, माधवराव खोटेले, एकनाथ हत्तीमारेल गुलाब मदनकर, नरेश कावरे, बाबूलाल कटरे, अविनाश टेंभरे, किसन रहांगडाले, बाबुलाल कटरे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनो स्वत:तील उर्जेला ओळखून यश गाठा-अविनाश अधिकारी

**गोंदिया:** नमस्कार हा असा शब्द आहे ज्यात संपूर्ण ब्रम्हांड सामावलेले आहे. ती आतून बाहेर पडणारी चेतना व उर्जा आहे. आपल्या सर्वांच्या आत ती उर्जा व चेतना असून, ती आपल्याला काहीतरी करण्यास प्रोत्साहित करते. पण ती आपल्या ओळखता आली पाहिजे. स्वत:तील उर्जेला ओळखून वाटचाल केल्यास निश्चितच ध्येय गाठता येत असल्याचे माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी सांगितले.



चाणक्य मंडळ परिवार आणि फॉर्च्युन फाऊंडेशन यांच्या संयुक्त व आमदार विनोद अग्रवाल यांच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम रविवारी रेलटोली येथील पोवार बोर्डिंग येथील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आमदार विनोद अग्रवाल, आशिष वांदिले, भाऊराव उके, मुनेश रहांगडाले, कशिश जायस्वाल, छत्रपाल तुरकर, शिव शर्मा, चैताली नागपुरे, विनोद किराड, जितेश टेंभरे, बाबा चौधरी, अनंदा वाढीवा, ममता वाढवे, दीपा चंद्रीकापुरे, दीपक बोबडे उपस्थित होते. अविनाश धर्माधिकारी म्हणाले, प्रत्येक जण उर्जा आणि चेतनेने परिपूर्ण आहे. आपल्याला फक्त त्याला जागे करण्याची गरज आहे. ते वेगळे असू शकते. काही जण विज्ञानात तर काही क्रीडा संस्कृतीत सरस असतात. तर काही कलेत, काही जीवशास्त्रात, काहींना साहित्यात, लेखनात तर काहींना लोकसेवेची आवड आहे. प्रत्येकाने आपल्यातील क्षमता ओळखून पुढे गेले पाहिजे.

मेंदू व स्नायू तंदुरूस्त ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तुमच्यातील देवाला जाणून घ्या आणि ते कोणत्या मार्गाने प्रकट होतो हे जाणून घ्या. हे आमच्या करिअरचे ब्रीदवाक्य आहे. आपल्यातील लपलेल्या प्रतिभेच्या अंतर्गत ते निवडा.

### मोठी स्वप्ने पाहून ती गाठण्याचा प्रयत्न करा

**इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थी आपल्या आयुष्यात कसे पुढे जाऊ शकतात. करिअर घडवू शकतात आणि यशस्वी व्यक्तिमत्व कसे घडवू शकतात. आपल्या स्वप्नांना उंच उड्डाण घेऊन प्रसिद्धी कशी मिळवता येईल याचा गांभीर्याने विचार करावा. मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण कशी करता येतील यासाठी प्रयत्न करावा, असे आ.विनोद अग्रवाल यांनी सांगितले.**

### स्पर्धा परीक्षा म्हणजे लोकसेवा

**स्पर्धा परीक्षांमध्ये पुढे जाऊ इच्छिणाऱ्या मुलांनी ही स्पर्धा परीक्षा म्हणजे लोकसेवा आहे हे समजून घेतले पाहिजे. स्वच्छ देशसेवेसाठी आहे. चांगला अधिकारी होण्यासाठी तो स्वच्छ असावा. भ्रष्ट नसावा, जातिवादी नसावा, कार्यक्षम असावा. त्यात कार्यक्षमता असावी. शिस्तीवर काम करा. मी देशाचा एक कार्यक्षम कार्यकर्ता आहे. अशी भावना ठेवा. तरच देशसेवेसाठी काम करता येईल, असा सल्ला धर्माधिकारी यांनी दिला.**

## नृसिंह मंदिरामध्ये ५ भाविक अडकले, बचाव पथकाने

**भंडारा :** जिल्हा नियंत्रण कक्ष येथे सकाळी साडेदहाच्या सुमारास मोहाडी तालुक्यातील नृसिंह मंदिरामध्ये ५ भाविक अडकल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तात्काळ बचाव कार्य सुरू केले.बचाव कार्याद्वारे मनोहर निंबार्ते, मनोहर हुरगेकर, कल्पना खुरगेकर, गिरीधर वाघोडे व वैशाली चौधरी या भाविकांची सुखरूप सुटका केली. या बचाव कार्यात उपविभागीय अधिकारी बी. वैष्णवी यांच्यासह जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव पथकाचे सीताराम कोल्हे, अमरसिंह रंगारी, अशोक देवगडे, कुंभलकर यांनी सहभाग घेतला होता.



# वाघीणी भरकटल्या,दोन पथक वाघिणीच्या मागावर

**गोंदिया :** जिल्ह्यातील नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातून भरकटलेल्या वाघिणीने मागील दोन महिन्यांपासून वन विभागाच्या पथकाला चांगलेच जेरीस आणले आहे. गुरुवारी गोंदिया तालुक्यातील रावणवाडी चंगेरा परिसरात दाखल झालेल्या वाघिणीने शुक्रवारी (दि.७) दुपारी पुन्हा आपला मार्ग बदलविला आहे.कामठामार्गे आता आमगाव तालुक्यातील घाटटेमनीच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे. त्यामुळे कामठा, घाटटेमनी परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात २० मे रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी वन परिक्षेत्रातून आणलेल्या दोन वाघिणी सोडण्यात आल्या होत्या. आठ-दहा दिवसांनंतर या दोन वाघिणींपैकी एक वाघीण नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातून भरकटली होती. ही वाघीण सडक अर्जुनीमार्गे गोरेगाव तालुक्यातील पिंडकेपार, हिरडामाली परिसरात दाखल झाली होती. त्यानंतर या वाघिणीने आपल्या मोर्चा गोंदिया तालुक्याकडे वळविला. तालुक्यातील पांगडी जलाशय परिसरात जवळपास दीड महिना मुक्काम केला. त्यानंतर ही वाघीण गुरुवारी (दि.६) भरकटत रावणवाडी चंगेरा परिसरातील राजा- राणी जंगल परिसरात दाखल झाली होती. त्यामुळे वन विभागाचे पथक रावणवाडी व चंगेरा परिसरात तळ ठोकून होते.

शुक्रवारी दुपारी ३:३० वाजेच्या सुमारास या वाघिणीने हा परिसर सोडत कामठा व घाटटेमणी परिसराकडे आपला मोर्चा वळविला. या वाघिणीला जीपीएस टॅगिंग लावले आहे. त्यावरून वन विभागाच्या चमूनेसुद्धा या वाघिणीचे लोकेशन कामठा-घाटटेमणी परिसरात दाखवीत असल्याचे सांगितले. या परिसरात वाघीण दाखल झाल्याने वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी या परिसरातील गावकऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना केल्या आहेत, तसेच रात्रीच्या वेळेस एकटे घराबाहेर पडू नये, असे आवाहन केले आहे.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातून भरकटलेल्या वाघिणीला परत व्याघ्र प्रकल्पात परतावून लावण्यासाठी वन व वन्यजीव विभागाचे दोन पथके मागील दोन महिन्यापासून प्रयत्न करीत आहे. या पथकांमध्ये २० ते २५ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. ज्या परिसरात वाघिणीचे लोकेशन असते त्या परिसरात ही चमू दाखल होते त्या परिसरातील नागरिकांना सतर्क करण्याचे काम ही पथके करीत आहेत. भरकटलेल्या वाघिणीला व्याघ्र प्रकल्पात कसे परतावून लावता येईल यासाठी मागील दोन महिन्यापासून वन विभागाची चमू प्रयत्न करीत आहे. पण त्यांच्या प्रयत्नांना वाघिण वांरवार हुलकावणी देत असल्याने अद्याप यश आलेले नाही.

# केसलवाडा-येळमाकोट रस्ता हरवला खड्ड्यात



**तिरोडा:-** रस्त्यांचे जाळे विकासाचे द्योतक मानले जातात. मात्र ग्रामीण भागातील अनेक रस्ते आज मृत्यूचे सापळे झाल्याचे पहावयास मिळते. त्यातीलच तालुक्यातील केसलवाडा-येळमाकोट रस्ता म्हणावा लागेल. या रस्त्यावर सर्वत्र खड्ड्याचे साम्राज्य पहावयास मिळते. वाहणे चालविणे तर सोडाच पायी चालणे देखील कठीण होऊन बसले आहे.

केसलवाडा-येळमाकोट रस्ता दोन्ही गावांना जोडणारा एकमेव रस्ता आहे. रस्ता ३ किमी अंतराचा आहे. या रस्तावर नियमित रहदारी असते. रस्त्यावरून कामगार, शेतकरी, विद्यार्थ्यांची सतत ये-जा असते. अनेक वर्षापासून या रस्त्याची साधी दुरूस्ती करण्याचे सौजन्य संबंधित विभागाने दाखविले नाही. लोक प्रतिनिधींनीही दुर्लक्ष केले आहे. पावसाळ्याचे दिवस असून रस्त्यातुन वाट काढणे कठीण झाले आहे.

रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो आहे. रत्यावरील खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी तुडूंब भरून आहे. खड्ड्यांच्या अंदाज येत नसल्याने अनेक वाहनधारकांना अपघाताला बळी पडावे लागत आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष देऊन तत्काळ खड्ड्यांची किमान डागडूजी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# गोंदियाच्या राष्ट्रवादीचा एकच निर्णय प्रफुल पटेल जिथे आम्ही तिथे

**गोंदिया :** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे आता दोन गट निर्माण झाले आहे. एक गट खा. शरद पवार यांचे समर्थन करणारा तर दुसरा गट ना. अजित पवार यांना समर्थन करणारा आहे.खा. प्रफुल्ल पटेल हे अजित पवार यांच्यासोबत असल्याने गोंदिया जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी आणि सदस्यसुद्धा त्यांच्यासोबत आहेत.



जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस च्या नेत्यांनी अजित पवार व प्रफुल्ल पटेल यांच्यासोबत असल्याचे शुक्रवारी (दि.७) जिल्हास्तरीय बैठकीत जाहीर केले. बैठकीला माजी आमदार राजेद्र जैन,जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, नरेश माहेश्वरी, केतन तुरकर, विशाल शेंडे, राजलक्ष्मी तुरकर, रमेश ताराम, योगेंद्र भगत, विनोद हरिणखेडे, सुरेश हर्षे आदी उपस्थित होते.

पक्षात वर्चस्व कोणाचे व कोणाच्या बाजूने किती नेते, कार्यकर्ते आहेत हे दाखविण्यासाठी खा. शरद पवार आणि ना. अजित पवार यांच्यात आता मकिस मे कितना है दमचा संघर्ष सुरू झाला आहे. त्यामुळे अनेक जिल्ह्यांत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट पडले आहेत.

मात्र, गोंदिया जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य, कार्यकर्ते एकसंघपणे खा. प्रफुल्ल पटेल यांच्या पाठीशी खंभीरपणे उभे आहेत. जिल्ह्यातून अद्यापही एकही पदाधिकारी व सदस्यांने आपले समर्थन खा. शरद पवार यांना असल्याचे जाहीरपणे पुढे येऊन सांगितले नाही.

जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकारी, नेत्यांनी आता आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी जोरदार मोर्चेबांधणी करण्याचा निर्णय घेतला आहे.जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रमुख नेत्यांनी खा. प्रफुल्ल पटेल यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा संकल्प केला आहे. आमचा निर्णय पक्का झाला असून आपला प्रफुल्ल पटेलानांच शिक्का असल्याचे सांगितले.